# प्रतिज्ञापत्र

मी भिमाशंकर चंद्रकांत लिगाडे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, “ पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्णन : एक अभ्यास ” ( ‘ अपूर्वाई ’, ‘ पूर्वरंग ’ या पुस्तकांच्या आधारे) या विषयावरील लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम्. फिल. ( मराठी ) या पदवी परीक्षेसाठी सादर करीत आहे.

हा लघु-प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही.

भि.चं.लिगाडे

सोलापूर<br>
दि. २८ जून २०००

अभ्यासक<br>
भिमाशंकर चंद्रकांत लिगाडे

# प्रमाणपत्र

भिमाशंकर चंद्रकांत लिगाडे यांनी **"पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्णन : एक अभ्यास"** ('अपूर्वाई', 'पूर्वरंग' या पुस्तकांच्या आधारे) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक रीतीने लघु–प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनांतील विश्लेषण आणि विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने अन्यत्र उपयोजिला नाही.

प्रस्तुत विषय "ललितगद्य" या वाङ्मय प्रकारातील आहे.

हा लघु–प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम्. फिल. (मराठी) पदवी परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

सोलापूर.
दि. २८ जून २०००.

**मार्गदर्शक,**
**(डॉ. कृष्णा जोतीराम इंगोले)**
**मराठी विभाग प्रमुख**
**सांगोला महाविद्यालय, सांगोला.**

**प्राचार्य,**
**संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर.**
**Principal-in-Charge**
**Sangameshwar College**
**Solapur**

DR. R. G. HIREMATH
Head Department of Marathi

# ऋणनिर्देश

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मराठी हा विषय घेतला असता आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास वाचण्याची संधी मिळाली. त्यामध्ये आधुनिक मराठी साहित्यात 'ललितगद्य' हा एक वाङ्मय प्रकार विविध अंगानी कसा विकसीत होत गेला याची जाणीव झाली. त्यातील लघुनिबंध, ललितनिबंध, व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे, चरित्र, आत्मचरित्रात्मक आठवणी, प्रवासवर्णने ही मुक्तपणाने लिहिलेली असल्यामुळे मला आवडत होती. तशातच पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले विविध वाङ्मय त्यातील विनोदामुळे आवडले होते. म्हणून एम्. फिल. या साहित्याचा अभ्यास करावा असे वाटले आणि प्रेरणा व मार्गदर्शन माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. कृष्णा इंगोले यांची मान्यता मिळाल्याने अभ्यासासाठी तो विषय निवडला.

पु. ल. देशपांडे यांनी कथा, व्यक्तिचित्रे, नाटके, विनोद असे विविध वाङ्मयप्रकार हाताळले असले तरी त्यांची प्रवासवर्णने खास वैशिष्ट्यपूर्ण अशी आहेत. त्यातही 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' ही त्यांची दोन्ही प्रवासवर्णने खूपच गाजलेली असल्याने त्या दोन पुस्तकांच्या आधारे पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनांचा अभ्यास करावा असा मनात विचार आला आणि त्यातून हा लघु–प्रबंध साकार झाला.

या लघु–प्रबंधाचा अभ्यास करताना माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. कृष्णा इंगोले यांच्या मार्गदर्शनाबरोबर संगमेश्वर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजशेखर हिरेमठ यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याच बरोबर डॉ. राजेंद्र बीडकर,(सेवानिवृत्त) प्रा. सुहास पुजारी, श्री. संत दामाजी महाविद्यालयाचे प्राचार्य मारुती जगताप, प्रा. सुरेश शिंदे यांचे ही सहकार्य लाभले त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. तसेच संगमेश्वर महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य एस्. एम्. घत्तरगी व विद्यमान प्राचार्य डॉ. व्ही. बी. अभ्यंकर यांनी प्रेरणा व सहकार्य दिले व सुविधा उपलब्ध करुन दिल्या त्या बद्दल मी कृतज्ञ आहे.

हा अभ्यास करताना मराठी प्रवासवर्णनपर साहित्याची फारशी समीक्षा झाली नाही. याची जाणीव होत होती. परंतू डॉ. वसंत सावंत यांच्या 'प्रवासवर्णन :एक वाङ्मय प्रकार' हा प्रबंध मिळाला त्यामुळे अभ्यासाला एक विशिष्ट दिशा आली. म्हणून त्यांचा ही मला ऋणनिर्देश करावा वाटतो.

या लघु–प्रबंधात अवतरणे परत परत आलेली असली तरी संदर्भ मात्र वेगवेगळे आहेत. एवढेच मी या संदर्भात नमूद करु इच्छितो.

या अभ्यासाच्या संदर्भासाठी संगमेश्वर महाविद्यालयाच्या समृध्द अशा ग्रंथालयाचे फार मोठे योगदान लाभले. त्याचबरोबर वालचंद महाविद्यालय सोलापूर, पूर्वविभाग वाचनालय सोलापूर, १००८ जगद्गुरु पंचाचार्य वाचनालय सोलापूर, ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचारी यांनी संदर्भग्रंथ देऊन जे जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

डॉ. राजशेखर हिरेमठ यांच्या शिफारस पत्राने सोलापूर येथील श्री सिध्देश्वर विद्यार्थी वसतिगृहामध्ये प्रवेश मिळाल्याने अभ्यास करणे सोयीस्कर झाले. या संस्थेचे संस्थापक श्री. मेघराज काडादी, चेअरमन श्री. सिध्देश्वर वर्दा, सेक्रेटरी श्री. बसवराज खदनाळे यांचा ही मी कृतज्ञ आहे.

या माझ्या अभ्यासात माझ्या आई–वडिलांचा फार मोठा वाटा आहे. गरीब परिस्थिती असतानाही मला शिक्षणात गरिबीची जाणीव करु दिली नाहीत. त्यांच्या मायेचा आणि कष्टांचा आशिर्वादाचा हात पाठीवरुन फिरला. मी एम्. फिल. पर्यंतचा शिक्षण करु शकलो आणि जि. प. शाळा डोणज येथील शिक्षिका सौ. मंदाकिनी मलगोंडे व बहिण आणि दोन्ही बंधू यांनी मला जी प्रेरणा दिली तसेच या अभ्यासाच्या कालावधीत माझे मित्र गणेश घोगले, संतोष बिराजदार, अशोक कोरे, महेश कवचाळे, बंडोपंत कुंभार, म्हाळप्पा कांबळे असे अनेक नवे मित्र मिळाले त्यांनी मदत केली त्यांचा ही मी आभारी आहे.

संगणकीय अक्षरजूळणीचे काम एस्. के. कॉम्प्युटर्सच्या श्री. उन्मेष शहाणे यांनी अल्पावधीत आकर्षक स्वरुपात केले त्याबद्दल त्यांचे ही आभार!

**– भिमाशंकर चंद्रकांत लिगाडे**

# पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्णन : एक अभ्यास

## अनुक्रमणिका

**प्रकरण पहिले : प्रवासवर्णन तात्विक चर्चा आणि परामर्श.** पृ. १ ते २४

**अ) ललितगद्य वाङ्मयप्रकार : स्वरुप व विकास.**

१) गद्यवाङ्मयाचे प्रकार व लघुनिबंध

२) ललितगद्य व प्रवासवर्णन यांचा संबंध

**ब) प्रवासवर्णन : एक वाङ्मय प्रकार**

१) प्रवास : एक आदिमप्रवृत्ती

२) प्रवासवर्णन :वाङ्मय प्रकाराची व्याख्या

३) प्रवासवर्णनाचे मुख्यघटक : प्रवासी महत्वाचा घटक, प्रवास, प्रदेश

**क) प्रवासवर्णनाच्या प्रेरणा**

पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनाच्या प्रेरणा,

१) मानवी जीवन व स्वभावाचे चित्रण,

२) विद्यार्जन व विद्‌वत्सभेत सहभाग,

३) आनंदाप्रित्यर्थ, ४) जिज्ञासेमुळे.

**ड) मराठीतील प्रवासवर्णनपर साहित्याचा परामर्श**

प्राचीन कालखंडातील प्रवासवर्णने, आधुनिक काळातील प्रवासवर्णने.

**इ) पु. ल. देशपांडे व्यक्ती आणि वाङ्मय**

पु. ल. देशपांडे यांची प्रवासवर्णने,

संदर्भ – सूची.

**प्रकरण दुसरे : पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनातील आशयसौंदर्य** पृ. २५ ते ७९

१) प्रवासवर्णन : एक अनुभव, २) 'अपूर्वाई' तील प्रवासवर्णनपर अनुभव,

३) 'पूर्वरंग'मधील प्रवावर्णनपर अनुभव,

४) प्रदेशवर्णन, ५) निसर्गस्थळवर्णन, ६) ऐतिहासिक स्थळवर्णन,
७) प्रवासवर्णनातील सांस्कृतिक दर्शन,
८) सामाजिक जीवनचित्रण, ९) संस्कृती विरोधाचे नाट्यमय चित्रण,
१०) प्रवासवर्णनातील व्यक्तिचित्रे, ११) लेखकाचे स्व–चित्रण,
१२) जीवनभाष्य,
संदर्भसूची.

**प्रकरण तिसरे : पु.ल.देशपांडे यांच्या प्रवासवर्णनातील अभिव्यक्तीसौंदर्य** पृ.८० ते १३५

**अ) प्रवावर्णनातील पु. लं. चे व्यक्तिमत्व**
१) विनोदी वृत्ती, २) कलाप्रेमी रसिक, ३) माणूसप्रिय कलावंत,
४) मध्यमवर्गीय जाणीव, ५) संस्कृतिप्रेम व विरोध जाणीव,
६) चिंतनशीलता, ७) आत्मपरीक्षण, ८) काव्यप्रेम.

**ब) प्रवासवर्णनातील विनोदाचा आविष्कार**
१) विनोदाचे स्वरुप, २) विनोदाचे प्रकार : शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, अतिशोक्तीतून साधलेला विनोदी.

**क) प्रवासवर्णनातील काव्यमयता**

**ड) प्रवासवर्णनातील निवेदनशैली व भाषाशैलीचे वैशिष्ट्ये**
१) कोकणी भाषेचा वापर, २) परकीय भाषेचा वापर, ३) परकीय कल्पनांचे मराठीकरण, ४) नाट्य व संगीतक्षेत्रातील परिभाषा, ५) संस्कृतभाषेचा समर्पक उपयोग.

**इ) प्रवासवर्णनातील चित्रमयता**
संदर्भ सूची

**प्रकरण चौथे : समारोप व निष्कर्ष** पृ. १३६ ते १४२
**संदर्भ ग्रंथ सूची**